**विषय:-**प्राथमिक शिक्षक,पदवीधर शिक्षक,मुख्याध्यापक मुख्याध्यापक,ग्रामपंचायत अधिकारी,आरोग्य सेवक,आरोग्य सहाय्यकइत्यादी सर्वच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असुनही अधिकारी/कर्मचारी कायद्याचे पालन करत नसलेबाबत.

सातारा जिल्हा परिषद सातारा,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.साजिप/साप्रवि-आस्था २(३)/ २०६३४८०/२०२५
दिनांक - ऑगस्ट,२०२५

वाचा: -१. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासननिर्णय क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१/सेवा-५ दि.७ ऑक्टोबर २०१६.
२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.पंरास २०१८/प्र.क्र. ४८८/आस्था-७ दिनांक ९ सप्टेंबर २०१९.
१. ईकडील परिपत्रक क्र.साजिप/साप्रवि-आस्था २(३)/५११४/२०२२ दिनांक - २२ सप्टेंबर, २०२२.
२. ईकडील परिपत्रक क्र.साजिप/साप्रवि-आस्था २(३)/९/२०२३ दिनांक - ३० सप्टेंबर, २०२३.

---

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते श्री.किशोर शिंदे,अध्यक्ष,श्रीमंत महादजी शिंदे शेतकरी संस्था यांचे ईमेल पत्र दि.०७/०६/२०२५ अन्वये शासनाच्या परिपत्रकांची अंमलबजावणी करत नसलेचे निवेदनाव्दारे कळविले आहे. जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक,पदवीधर शिक्षक,मुख्याध्यापक,ग्रामसेवक,ग्रामविकास अधिकारी,आरोग्य सेवक,व आरोग्य सहाय्यक वैद्यकीय अधिकारी,विस्तार अधिकारी इत्यादी सर्वच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असुनही अधिकारी/कर्मचारी कायद्याचे पालन करत नसलेबाबत तक्रारी वजा निवेदनाव्दारे कळविले आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.पंरास २०१८/प्र.क्र. ४८८/आस्था-७ दि.९ सप्टेंबर २०१९ अन्वये ग्रामीण भागातील कर्मचा-यांच्या बाबतीत,कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी विहित केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे ही तरतूद वित्त विभागाच्या दि.७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये वगळली परंतु जिल्हा परिषदेतील ग्रामसेवक, शिक्षक व संबंधीत आरोग्य कर्मचारी मुख्यालयी राहण्यासाठी ठोक उपाययोजना करणे आवश्यक आहे. याकरिता “प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक मुख्यालयी रहात असल्यासंबंधी संबंधित ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेचा ठराव बंधनकारक आहे” असे नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने परिपत्रक क्र. साजिप/साप्रवि-आस्था २(३)/५११४/२०२२ दिनांक - २२ सप्टेंबर, २०२२ रोजीचे परिपत्रकान्वये महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजीचे शासन परिपत्रकातील सुचनांनुसार प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक यांना मुख्यालयी रहाण्यासंबंधी सुचना अलाहिदा देण्यात आल्या आहेत.

सबब महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजीचे शासन परिपत्रकातील सुचनांनुसार प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक, वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी इत्यादी सर्वच अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी रहात असल्यासंबंधी संबंधित ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेचा ठराव घेवून त्याची प्रत तालुकास्तरावर त्यांची आस्थापना असलेल्या ठिकाणी जतन करुन ठेवणेबाबत तसेच प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक, वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी इत्यादी सर्वच अधिकारी/कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असलेबाबत आपले स्तरावरुन सक्त सुचना देण्यात याव्यात.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने उक्त मुद्यांबाबत काटेकोरपणे पालन करुन अंमलबजावणी करावी. यामध्ये हलगर्जीपणा अथवा टाळाटाळ झाल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करावी.

Digitally signed by
YASHNI NAGARAJAN
Date: 21-08-2025
13:40:23

याशनी नागराजन,भा.प्र.से.,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद, सातारा

प्रति,

१. संबंधित खाते प्रमुख, जिल्हा परिषद सातारा
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
३. गटशिक्षणाधिकारी , पंचायत समिती (सर्व)
४. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

प्रत :- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा.
प्रत :- प्रकल्प संचालक, जि. ग्रा. वि. यंत्रणा सातारा.